
राचे समर्थ सेनानी

# बुद्धभक्त

रा.वा.शेवडेगुरुजी



BVBK-0401477

बा.वा.
१७५८
६।८।८३

कुमारांकरिता चरित्र कादंबरिका

समता-संगराचे समर्थ सेनानी

# बुद्धभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर

म. वं. सं. कर्वे, वाचनालय शाखा.
बालविभाग
वा १७५८
विषय ६।८।८३

लेखक :
रा. वा. शेवडेगुरुजी
एम. ए. बी. टी.

BVBK-0401477

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे : ४११ ०३०

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे : ४११०३०

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मुद्रक :
श्री. हरीश विनायक चौधरी
अंजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
५४३, ई, शाहूपुरी, कोल्हापूर - ४१६००१

प्रकाशक :
अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
धनश्री अपार्टमेंटस्, पेरुगेटाजवळ
सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०

प्रथमावृत्ती : जून १९८१

मुखपृष्ठ सजावट :
श्री. मधुकर ओतारी, मयूर आर्टस्, कोल्हापूर

किंमत : तीन रुपये फक्त

माझे विचारवंत, विनयशील, थोर स्नेही

**आम. पी. बी. साळोखे**

व

**मान. डी. सी. नरके**

चेअरमन, कुंभी–कासारी सह. साखर कारखाना लि., कुडित्रे

या उभयतांच्या कार्यकर्तृत्वास

**प्रेमादरपूर्वक अर्पण**

# मनोगत

अस्पृश्य समाजात या विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाचा एक महान चमत्कार होऊन गेला. त्यांचे जीवन आणि कार्य शतकानुशतके गरिबांना आणि दलितांना मार्गदर्शक ठरल्यावाचून राहणार नाही.

त्यांच्याविषयी अनेकांनी गौरवपूर्ण लिहिले. त्यांना लाविली गेलेली विश्वभूषण, विश्ववंद्य, दलितांचे कैवारी, सामाजिक क्रांतीचे पाईक, विद्येचे उपासक, ज्ञानियाचा राजा, बुद्धानुयायी, थोर बुद्धभक्त, एक व्यावहारिक संत इत्यादी विशेषणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आगळेपण आणि वेगळेपण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मेणाहून मऊ व प्रसंगी वज्राहून कठोर होते. गांधींचे प्राण वाचावेत म्हणून त्यांनी माघार घेतली पण पंडितजींच्याशी मतभेद होताच त्यानी खाड्दिशी राजिनामा खरडून टाकला.

अशा या बुद्धभक्त बाबासाहेब आंबेडकरांच्या चैतन्यपूर्ण जीवनाचा आणि महान कार्याचा परिचय मराठीतील माझ्या किशोरकिशोरींना उद्बोधक ठरो, एवढीच एक शिक्षक या नात्याने माझी सदिच्छा.

२२०५, डी, शुक्रवार
कोल्हापूर ४१६००२

वा. क्र. १४५८ दि. क
विषय ......... ५८/८३

## | १ |

सुरेख सुंदर सकाळच्या वेळी इंदूर शहरापासून काही मैल अंतरावरच पडलेल्या महूच्या छावणीतून सुभेदार रामजीबाबा सपकाळ थोडे पाय मोकळे करण्यासाठी म्हणून बाहेर पडले. नदीकाठच्या निसर्गाने त्यांचे मन मोहून टाकले. त्यांच्या आनंदाला जणू साथ म्हणूनच की काय पक्ष्यांचा किलबिलाट कानी पडत होता. नदीकाठचे टुमदार मंदिर दिसताच मुळातच भाविक असलेल्या रामजीबाबांच्या मनात देवदर्शनाची उत्कट इच्छा निर्माण झाली.

देवळाच्या दिशेने ते चालले. मोकळचा दगडी आवाराच्या कोपऱ्यात काही साधू बसून मधून मधून चिलिमीचा झुरका ओढीत होते तर काही चर्चा करीत होते. साधूंच्या जीवनासंबंधी रामजीबाबांच्या मनात सहजच विचार येऊ लागले. हे साधू कसे राहात असतील ? काय खात असतील ? थंडी वाऱ्याची बाधा त्याना होत नसेल का ? घरी परत जाऊन नातेवाईकांना भेटण्याची इच्छा त्यांना होत नसेल का ?–

अशा विचारांच्या तंद्रीत रामजीबाबा त्या मंदिराच्या अगदी जवळ आले. समोरची नंदीची घोटीव बाळसेदार मूर्ती पाहून ते शिवमंदिर असल्याचे त्यानी ओळखले. त्यानी त्या साधूंच्याकडे पाहिले. त्यातल्या एका साधूने त्यांचे मन वेधून घेतले. ते त्या साधूकडे एकटक स्तब्ध उभे राहून पाहू लागले. त्यांच्या मनाची खात्री झाली. दोन पावले पुढे होऊन ते उद्‌गारले, ‘ काका !’

साधूंनी रामजीबाबांच्याकडे पाहिले. त्यांत त्यांचे काका होते. त्यानी रामजीबाबांना ओळखले. ते म्हणाले,

'रामजी बेटा, अरे तू इकडं कुठं ?'

'काका मी सैन्यात सुभेदार आहे.'

'छान छान ! किती तगडा दिसतोस रे !'

'होय काका, या महूच्या टेकडीवर आमचा तळ पडलाय. चला ना आमच्या मुक्कामावर. कालच भिमी - माझी वायको मला भेटायला आली आहे तिला कित्ती कित्ती आनंद होईल तुम्हाला पाहून.'

'बेटा, पुन्हा मायाजालात शिरायचं ? अरे, ते कसं शक्य आहे ? मी सारे कुटुंबपाश शिवार्पण केले आहेत.'

'पण काका, आला असतात तर भिमीला –'

'एवढं मात्र खरं की, तुला पाहून मला खूप आनंद झाला. मी तुला मनापासून आशीर्वाद देतो. रामजी, तुझ्या आणि भिमाबाईच्या पोटी एक तेजस्वी पुत्र जन्माला येईल. नाव काढील तो तुमचं आणि तुमच्या जातीचं.'

काका येत नाहीत म्हणून रामजीबाबा खट्टू झाले.पण काकानी दिलेला गोड गोड आशीर्वाद भिमीला केव्हा एकदा सांगेन असे त्याना झाले. ते हरिण पाडसाच्या हलक्या गतिमान पावलांनी छावणीवर आले. भिमी त्यांची वाटच बघत होती. रामजीबाबानी काकांचा आशीर्वाद भिमीला सांगितला. भिमी लाजेने चूर झाली.

भिमाबाई गरोदर राहिली. तिला पुत्ररत्नाची प्राप्ती झाली. १४ एप्रिल १८९१ चा तो दिवस. भिमी रामजीबाबांना म्हणाली,

'धनी –'

'बोल भिमे, काय सांगायचंय तुला ?'

'हे गोड गोंडस पोर आपल्या चुलत आज्याच्या आशीर्वादानं पराक्रमी होणार असं मला वाटतंय.'

'आणि मलासुद्धा तसंच वाटतंय.'

'मग आपण त्याचं नाव भीमच ठेवू.' दोघांच्या तोंडून एकदम उद्गार गेले आणि क्षणभर दोघेही आपले हसू आवरू शकले नाहीत.

गाढ झोपी गेलेल्या भीमाला गोधडीत गुंडाळून थोडेसे बाजूला ठेवून पुन्हा नवराबायकोत बोलणे सुरू झाले. रामजीबावा म्हणाले,

'मी सुभेदार आहे.'

'न्हाई कोण म्हणतय एवढं ठासून सांगायला? मला काय ठावं नाही?'

'तसं नव्हे ग.'

'मग कसं?'

'म्हटलं आपल्या भीमाला खूप खूप शिकवायला मला काही अडचण पडायची नाही. अस्सा शिकवून त्याला शहाणा करतो –'

'पुरं करा, न्हाई तर तुमचीच दृष्ट लागायची माझ्या बाळाला.'

रामजीबाबांची नोकरीतली अशीच दोन वर्षे गेली. ते सैन्यातून निवृत्त झाले. त्यानी दापोलीला बिऱ्हाड केले. रामजीबाबाना मिळणाऱ्या सैनिकी पेन्शनीत समाधानाची मीठभाकरी ते खात होते. पुढे हळूहळू भीम पाच वर्षांचा झाला.

एके दिवशी भिमाबाई म्हणाली,

'धनी, भीमाच्या जन्माच्या वेळंला लई गप्पा मारीत होतासा. आता मात्र परीक्षेची वेळ आलीय.'

'परीक्षा? कसली परीक्षा?'

'न्हवं, आता भीमाला शाळेला घालायला हवय.'

'मग घालू की.'

'तसं न्हवं. तुमच्या पेन्शनीत त्याच्या शिक्षणाचा खर्च भागायला हवा. मी आपली न्हाईन काटकसरीनं.'

'त्याची काय बी काळजी करू नको.'

'म्हणजे? मला न्हाई उमगलं, काय कुठं गठळंबिठळं – ?

' अग, माझ्या मित्रांनी मला एक नोकरी बघून द्यायचं कबूल केलंय. मग काय ! पेन्शन अधिक नोकरीचा पैसा. त्याला काय कमी ! '

लौकरच रामजीबाबांना साताऱ्याला नोकरी मिळाली. त्यांच्या मित्रांनी त्याना दिलेले आश्वासन पुरे करून दाखविले. रामजीबाबा आणि भिमाबाई यांच्या त्यांच्या भीमाला शिकवून मोठ्ठं करण्याच्या आशा उंचावल्या.

रामजीबाबानी सैन्यात मास्तरकी केली होती. त्याना शिकवायचा अनुभव होता. त्यानी भीमाकडून धुळाक्षरे, पाढे, परवचा, घोकून घ्यायला सुरवात केली. भीमा पोरगा तर एवढा चलाख की जणू एकपाठीच. रामजीबाबांच्या कुटुंबात एवढा आनंद भरून राहिला होता की, उगीचच त्यांच्या मनाला हूरहूर लागून राही की, आपल्या या सुखी संसाराला आपलीच दृष्ट तर लागणार नाही !

☐

## । २ ।

— आणि तसेच झाले !

रामजीबाबांचा सुखी संसार नियतीला पाहवला नाही. अल्पशा आजाराने भिमाबाई निधन पावली. रामजीबाबांच्यावर, त्यांच्या कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला. भीम आईविना पोरका झाला. त्याच्या दु:खस्थितीची रामजीबाबाना कल्पनाच करवेना. एखाद्या बाईमाणसासारखे रामजीबाबा ओक्साबोक्शी रडू लागले. सांत्वनाला येणाऱ्या जाणाऱ्याला ते काकुळतीने सांगत, ' आईविना माझ्या पोराचं आता कसं होणार ? मी मस्त त्याच्यासाठी कष्ट करून खर्च करीन. पण ज्या आईच्या मायेत पोरांची मनं फुलतात, मोठी होतात, ती आईची माया मी कशी देऊ ?'

भीमाच्या आत्याला — मीराताईला — आपल्या भावाची दया आली. ती पुढे होऊन म्हणाली,

' रामजीभाऊ —'

' काय ग ताई ?'

' असा रडू नकोस. '

' मग दुसरं काय करू ?'

' हे बघ. बापैमानसानं असा धीर सोडू नये. मी सांभाळीन तुझ्या या भीमाला. काय बी काळजी करू नकोस. '

रामजीबाबांना मोठा आधार वाटला. त्यांचे मन दैवाबरोबर देवावरही रुष्ट झाले होते. पण ताईच्या रूपाने आपल्याला देव पावला असे मानून त्यांनी हात जोडले आणि मनोमन देवाजीची क्षमा मागितली.

रामजीबाबांची बहीण मीराबाई जणू भीमाची दुसरी आईच बनली. त्याचा सांभाळ करू लागली.

भीमाच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला आता रामजीबाबाना जोर चढला. भीमाचे खाणेपिणे मीराआत्या बघे. तो खाऊन पिऊन सशक्त आणि तगडा व्हावा याची ती काळजी घेई.

रामजीबाबानी सैन्यात मास्तरकी केली होती. त्याना रामायण, महा–भारत, भागवत यांची पुरेपूर माहिती होती. त्यानी त्यातल्या एक एक सरस आणि सुरस कथा भीमाच्या कानावर घालायला सुरवात केली.

राजवाड्यात सुखात जन्माला आलेल्या रामाला लहानपणीच विश्वा-मित्राच्या यज्ञाचे रक्षण करावे लागले. राक्षसांचा संहार करावा लागला. मथुरेत तुरुंगात जन्माला आलेला श्रीकृष्ण आईविना पोरका होऊन गोकुळात मानलेल्या आईच्या कुशीत वाढू लागला. यशोदामाईने देवकी मातेची त्याला आठवणसुद्धा होऊ दिली नाही. गोकुळात श्रीकृष्णावर कंसाने मारेकरी घातले. अगदी ऐन बारश्याच्या दिवशी पूतनामावशी आली होती. पण आपल्या साम-र्थ्याने, चातुर्याने आणि बुद्धिबळाने श्रीकृष्णाने साऱ्या शत्रूंचे पारिपत्य केले. कौरवांकडून भाऊबंदकीत पांडवांनी असेच हाल सोसले. पण जय अखेर सत्याचाच झाला.

रामायण, महाभारत, भागवत, याप्रमाणे संत–महंतांचे अभंग, ओव्या, दोहे, गाणी रामजीबाबांनी भीमाकडून तोंडपाठ करून घेतली होती. ‘लहानपण देगा देवा’ ‘क्षमा शांती जया नराचिया हाती’ असले तुकारामांचे अभंग, ‘पक्षी जाय दिगंतरा’ हा जनाबाईचा अभंग आणि ‘उस डोंगा परी रस नोहे डोंगा’ हा चोखामेळचाचा अभंग असे अनेक अभंग, त्यांचा सुबोध अर्थ सांगून भीमाकडून रामजीबाबा तोंडपाठ करून घेत असत.

आपल्या रामजीदादाचा हा खटाटोप पाहून एकदा मीराआत्या त्याना म्हणाली,

‘ रामजीभाऊ, एवढंसं ते पोर नी किती कोंबतोस त्याच्या डोक्यात ?’

‘ तुला का त्याची काळजी ?’

‘ तसं न्हवं रे. त्याचं डोकं पिकून जाईल की !’

‘ तुला न्हाई कळायचं ते. मी नॉर्मल शाळेचा हेडमास्तर होतो. तुला काय कळतंय ? अग लहानपणीच घोकून घ्यावं, म्हणजे मोठेपणी त्याचा उपयोग होतो. ’

‘बरं ऽ बर ऽ बाबा. चालू दे तुम्हां बापलेकांचं, आम्हा अडाण्यांना काय कळायचंय ?’

‘ चालणारच. भीमाचा भीमराव करायचाय मला. ’

रामजीबाबानी शिकविलेले सारे अभंग भीमा जेव्हा घाडघाड म्हणून दाखवी तेव्हा मीराआत्याचे तोंड पोस्टाच्या पेटीसारखे आश्चर्याने अवाक् होई.

रामजीबावांच्या अशा कडक पण प्रेमळ मार्गदर्शनाखाली भीमाचे घर-गुती शिक्षण पुरे झाले आणि रामजीबाबांनी त्याला शाळेत घालण्याचे ठरविले.

भीमाचे नाव त्यानी शाळेत भीमराव रामजी आंबवडेकर म्हणून दाखल केले. नावाबरोबर आंबेडकर गुरुजींनी त्याची जात विचारली. महार असे सांगितल्यावर वर्गातील सारी मुले आश्चर्यचकित झाली. बाकावर नव्हे तर एका कोपऱ्यात एका पटकुऱ्या पोत्यावर त्यांनी त्याला बसायला लावले. वर्गा-तल्या साऱ्या पोरांनी बाकावर बसायचे आणि आपण मात्र एका कोपऱ्यात. भीमरावाच्या करुणकोमल भावनाप्रधान मनाला हा पहिला धक्का बसला. परंतु मुले जरी दुस्वास करीत असली तरी गुरुजी मात्र प्रेममूर्ती होते.

सर्व मुलांत भीमराव तल्लख ठरला. त्याचे उत्तर बिनचूक येत होते.

असेच एकदा साऱ्या वर्गाला गुरुजीनी एक अवघड गणीत घातले. सगळ्यांनी पाटीवर सोडविले.गुरुजीनी पाट्या तपासल्या. फक्त भीमरावाचे उत्तर बरोबर होते. गुरुजीनी त्याची तारीफ केली आणि यामुळे मुलांच्या दुस्वासात भरच पडली.

एकदा गुरुजी त्याला म्हणाले,

' भीमू, आता तू सोडविलेलं गणीत साऱ्या वर्गाला फळचावर करून दाखव. '

वर्गातल्या मुलांनी एकच गिल्ला केला –

' नाही नाही ! भीमानं फळचाला स्पर्श करता कामा नये, कारण तो महार आहे. '

' आम्ही आमचे जेवणाचे डबे फळचाला लागून ठेवलेत, ते विटाळतील.'

गुरुजींचा नाइलाज झाला. भीमरावाला बसल्या जागीच प्रश्नांची उत्तरे द्यावी लागली.

मधल्या सुट्टीत मुले पाणी प्यायला जात. त्याप्रमाणे एकदा भीमरावही गेला. मुलांनी त्याला विरोध केला. ती म्हणाली,

' नाही, नाही ! तू या पाण्याच्या पिंपाला हात लावता कामा नयेस. तुला पाणी मिळणार नाही. '

' पण मला खूप तहान लागलीय. ' भीमराव काकुळतीने म्हणाला.

या घटनेकडे आंबेडकर गुरुजींचे लक्ष होते. पाण्याचा तांब्या घेऊन भीमरावाकडे येत ते म्हणाले,

' भीमू बेटा. हाताची ओंजळ कर. मी त्या ओंजळीत पाणी ओततो. पी पोटभर. '

' पण गुरुजी, हे असं का ?'

' तुला तहान लागली आहे ना ?मग आधी पाणी पी. '

भीमराव मुकाटचाने मन मारून पाणी प्याला.

एकदा गोरेगावला नोकरी करीत असलेल्या रामजीबावानी ' मसूर स्टेशनवर तुम्ही उतरा. तिथं मी तुम्हांला न्यायला येतो, ' असा निरोप दिला होता. निरोपाप्रमाणे भीमराव व त्याचा मोठा भाऊ आनंदा मसूर स्टेशनवर आले.

निरोपाप्रमाणे रामजीबाबा त्यांना दिसले नाहीत.

स्टेशनवर त्यांनी मसूर गोरेगाव अंतराची चौकशी केली. एवढे अंतर

चालून जाणे त्यांना शक्य नव्हते. रस्त्याने एक गाडी चालली होती. पोरांच्याकडे बघत गाडीवान म्हणाला,

'पोरांनो, आरं एवढ्या उन्नाचं कुटं चाललाय ?'

'गोरेगावला.'

'आरं, मग एवढ्या लांब चालत जानार ? अं, कुनाचं रं तुमी ?'

'रामजी सपकाळाचं.'

'म्हंजे म्हाराचं म्हणा की.'

'व्हय. गाडीवानमामा, आमाला नेतासा का गाडीतनं ! चार आनं देऊ बगा.'

'छे छे ! असं कसं ? माजी गाडी इट्टाळंल. बैल बी इट्टाळतील नी मला बी इट्टाळ व्हईल न्हवं का ?'

भीमरावाच्या मनावर आणखी एक आघात झाला. तो मनात म्हणाला- 'हे असं का ?'

'हे बघा गाडीवानमामा', आनंदा थोडे धिटाईने म्हणाला, 'अवो इट्टाळ बिटाळ कसलं काय घिऊन बसलाय. नी लहान पोरांचा वो कसला इट्टाळ ! जरा करा की मदत आमास्नी. चांगलं आठ आणं देऊ बगा.'

आठ आणे शब्द कानावर पडताच गाडीवानाच्या तोंडाला पाणी सुटले. तो म्हणाला,

'पोरांनो, बसा बरं गाडीत.'

भीमराव, आनंदा गाडीत बसले. गाडीवान गाडी हाकू लागला. भीमराव हळूच म्हणाला,

'मग आता तुमच्या इट्टाळाचं कसं ?'

आनंदाने भीमरावाचा कान पकडला. गाडीवान रागाने गाडीतून उतरायला लावेल याची भीती वाटली त्याला. गाडीवान उत्तरला,

'हे बघा पोरांनो, तुमचं हाल मला बघवेनात. घरी गेल्यावर गाडी बैलावर गोमुत्र शिपडून टाकीन की मी. मग इट्टाळ पार पळून जाईल.'

दोन्ही पोरे खुदकन हसली. मग आनंदा म्हणाला,

' मग तुमी बी अंगावर गोमुत्र शिपडून घेनार म्हना की. '

' ओघानं आलंच. हं पोरांनो, आधी आठ आनं द्या बघू. मी आता गाडी जोरानं हाकनार हाय. घट्ट धरून बसा. '

लौकरच गाडी गोरेगावला आली.

संध्याकाळच्या वेळी रामजीबाबांच्या परवानगीने आनंदा आणि भीमराव गावात फेरफटका करायला गेले. वाटेत त्यांना एक विहीर दिसली. विहिरीवर काही मुले रहाटाने पाणी ओढीत होती. ओढता ओढता ती थकत होती. भीमराव म्हणाला,

' मुलांनो थांबा हं. आम्ही तुम्हांला मदत करतो. '

आनंदा व भीमराव रहाटाकडे गेले. रहाटाला ते हात लावणार इतक्यात तेथेच बसलेला एक ढेरपोटचा लांब शेंडीवाला ब्राह्मण त्या दोघांवर गरजला,

' अरे, तुम्ही त्या रामजी सुभेदाराची पोरं, म्हणजे महाराची पोरं. हात लावू नका त्या रहाटाला. विहीर विटाळेल आमची. आख्खं गाव पाण्याविना तडफडेल नुसतं. चला चालते व्हा. नाही तर तंगडीच तोडून टाकतो एकेकाची'

भीमराव व आनंदा पार पळाले. आनंदाने घर गाठले. भीमराव दाराच्या दगडी डंवऱ्यावर बसला. आपल्या दोन गुडघ्यावर हाताचे पंजे ठेवून त्यात आपले डोके खुपसून स्वत:शी उद्गारला – हे असं का ? आम्ही का कोणी माणसं नव्हेत ? जादा पैसे दिले म्हणजे विटाळ चालतो. असं तरी आमचं शास्त्र नसेल ?

□

## । ३ ।

भीमराव व आनंदा आपल्या गावी परत आले. त्यांची शाळा पुन्हा सुरू झाली. शाळेतले वातावरण भीमरावाच्या अंगवळणी पडलेच होते. विषमतेचा मधून मधून त्याला उबग येई. अगदी नकोनकोसे होई. पण आंबेडकर गुरुजींची प्रेमळ मूर्ती नजरेसमोर आली की, अशा गुरुजींच्या सुखद सहवासाकरिता हवे तेवढे दुःख सोसायला त्याच्या मनाची तयारी असे.

आंबेडकर गुरुजीनी भीमरावाला गणिताची, भाषेची व इतिहासाची खूप गोडी लावली. भीमरावाची तल्लख बुद्धी आणि असामान्य हुशारी पाहून त्याना मायेचे भरते येई. ते त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवीत.

एकदा ते त्याला म्हणाले,

' हे बघ भीमू, आता या गावात तुझ्या पुढच्या शिक्षणाची सोय नाही. काही तरी कर्तृत्व करण्यासाठी माणसाचा जन्म असतो. ती शक्ती शिक्षणातून मिळते. तुला शिक्षणाकरिता मोठ्या शहरातच गेलं पाहिजे. रामजी–बाबाना मी बोलतोच. पण तूही त्याना कल्पना दे. आणि एक सांगू तुला भीमा –'

' बोला ना. तुम्ही तर गुरुजी. तुम्हीच संकोचायला लागलात म्हणजे संपलंच की सगळं !'

'माझी आठवण म्हणून तुझं आंबवडेकराचं आंबेडकर असं नाव करू या.'

' मग करा की. नको कोण म्हणतंय ? मलासुद्धा वाटेल सतत तुम्ही माझ्या पाठीशी आहात म्हणून. '

हजेरीपट घेऊन भीमराव रामजी आंबवडेकर या ऐवजी भीमराव रामजी आंबेडकर असे गुरुजींनी लिहून टाकले.

आपल्या नावात गुरुजींनी केलेला बदल भीमरावाने घरी आल्यावर मोठ्या अभिमानाने सांगितला. या बदलाचे फारसे कोणाला काही वाटलेच नाही. उलट मीराआत्या त्याला कौतुकाने चिडवी. ती म्हणे,

'काय हो भीमराव आंबेडकर, झाला का अभ्यास ? या जेवायला नी जावा लौकर शाळेला. तुमचं गुरुजी वाट बघत बसलं असतील.'

'हो हो आहेतच माझे गुरुजी तसे प्रेमळ. मधल्या सुट्टीत आपल्या डब्यातलं जेवण देतात ते मला. एकदा त्यानी मला विचारलं –'

'काय विचारलं तुला ?'

'जेवणात तुला कोणता पदार्थ फार आवडतो. मी म्हटलं भज्जी. नी काय आश्चर्य ! दुसरे दिवशी डब्यातून त्यानी भज्जी आणली होती, अगदी खास माझ्यासाठी.'

मीराआत्याबरोबर भीमरावाचा काळ मोठ्या आनंदात जात होता. आपल्या आईला जणू तो विसरून गेला होता. पण एके दिवशीचा तो प्रसंग !

मुलांना आनंदाने हाका मारून मीराआत्या म्हणाली,

'बाळांनो, धावा धावा.'

'काय ग आत्या ? आज मोठ्या खुशीत दिसतेस.'

'हो तर. अरे तुमचे बाबा तुम्हांला आता एक नवीन आई आणणार आहेत.'

'नवीन आई म्हणजे ग काय मीराआत्या ?'

'रामजीभाऊ दुसरं लगीन करणार हाय. म्हणजे ही नवी आई तुमची काळजी घेणार हाय. अगदी खऱ्या आईसारखी. आनी –'

'आणि ग काय आत्या ?'

'माझी जबाबदारी सपनार हाय. तुमची आई गेल्यापासून मी तसं वचन दिलं होतं तुमच्या बाबाला.'

या वातमीने मुले आनंदून जातील असे मीराआत्याला वाटले. आनंदाला आनंद झाला, परंतु भीमरावाला ही गोष्ट मुळीच आवडली नाही. तो फुरगटला, खट्टू झाला, चिडला, मुठी घट्ट आवळू लागला, दात ओठ खाऊ लागला. मीराआत्या म्हणाली,

'भीमा, एवढं चिडायला रं काय झालं ?'

'नाही तर काय ? ही कोण कुठली बाई आणि म्हणे आमची आई. आमच्या आईचे दागिने घालील, आमच्या आईची लुगडी नेशील —'

'मग त्यात काय बिगाडलं ? '

'त्यापेक्षा मी पळून जाईन मुंबईला.'

रामजीबाबांचे दुसरे लग्न नक्की झाले आणि भीमरावाच्या मनात मुंबईला पळून जाण्याचा विचार आला. पण मुंबईला जायचे म्हणजे काही थट्टा नव्हे. त्यासाठी पैसे लागतात. निदान भीक मागून पोट भरायचे म्हटले तरी भाड्यासाठी तरी पैसे हवेत ? भीमरावाच्या डोक्यात एक कल्पना सुचली. मीराआत्या झोपल्यावर तिचा बटवा चोरायचा आणि त्यातले पैसे घेऊन पार मुंबईला पळून जायचे. बटवा चोरण्याचा प्रयत्न भीमरावाने एकदा दोनदा, तीनदा केला. पण त्यात त्याला यश आले नाही. शेवटी त्याने मनाचा हिय्या केला आणि एकदाचा बटवा चोरला. तो त्याने उघडून पाहिला; तर त्यात नुसता ढब्बू पैसा. एका बाजूने तो निराश झाला दुसऱ्या बाजूने चोरी केल्याचा त्याला पश्चात्ताप झाला. तो मनात म्हणाला. 'मीराआत्या किती प्रेमळ ! आम्हां पोरांसाठी ती किती खस्ता खाते. भांडी घासते, आमचे कपडे धुते, वेळेवर जेवायला घालते आणि वर प्रेमानं पाठीवरून हात फिरवून ती कौतुकानं म्हणते, 'वैनीला नवसानं झालेला मुलगा भीमराव फार मोठ्ठा होणार आहे आणि अशा प्रेममयी मीराआत्याचा बटवा मी चोरावा ? छे छे ! फार मोठ्ठं पाप घडलं आज माझ्या हातून. आता मी हे पाप कसं फेडू ?'

पुढे रामजीबाबा आपल्या दुसऱ्या बायकोला घरी घेऊन आले.

सात इयत्तेपर्यंतचे भीमरावाचे शिक्षण संपले होते. वर्गात त्याचा पहिला नंबर होता. पुढील शिक्षणासाठी जर तो मुंबईला जाईल तर त्याचे

कल्याण होईल असे आंबेडकर गुरुजींचे मत पडले. रामजीबाबांच्या मित्रां–च्येही मत तसेच होते.

नवी वायको नी दोन पोरे घेऊन रामजीबावांनी मुंबईचा रस्ता धरला. निरोप देताना आंबेडकर गुरुजींचे डोळे पाण्याने भरून आले होते. ते प्रेमाने, दु:खाने नव्हे. मोठ्या शहरात गेल्यावर भीमरावाला अस्पृश्यतेचे काटे टोच-णार नाहीत असे त्यांच्या भाबड्या मनाला वाटत होते. मुंबईला जाण्यापूर्वी भीमरावाने आपल्या गुरुजींच्या चरणावर मस्तक ठेवून आशीर्वाद घेतला आणि 'गुरुजी, खूप खूप अभ्यास करून मी मोठा होईन' असे तो म्हणाला.

रामजीबावा मुंबईला आले. परळच्या कामगार वस्तीत एका चाळीत त्याना एक खोली मिळाली. जेवणखाण, झोपणे, अभ्यास, तेथेच. एका कोप–ऱ्यात एक पाळलेली शेळी बांधलेली. अशा खोलीत राहून भीमरावाचे मुंबई-तले शिक्षण सुरू झाले.

भीमाला घेऊन रामजीबाबा एलिफन्स्टन हायस्कूलमध्ये गेले. हेड–मास्तराना ते म्हणाले,

'माझा मुलगा संस्कृत घेईल.'

'माफ करा.' गुरुजी म्हणाले.

'का बरं? काही अडचण?'

'अस्पृश्य मुलांना संस्कृत घेता येत नाही. त्याला पर्शियनच घ्यावं लागेल.'

'चला. पर्शियन तर पर्शियन.'

रामजीबाबाना या घटनेचे काही विशेष वाटले नाही. पण भीमरावाची खपली पडत चाललेली जखम या धक्क्याने पुन्हा उघडी पडली. तो मनात म्हणाला, 'हे असं का? मीही काही कच्च्या गुरूचा चेला नाही. पुस्तकं आणून घरात वाचून संस्कृत शिकेन मी.'

खोलीत गडबडीत सकाळी भीमरावाच्या अभ्यासात अडथळा येत असे म्हणून जवळच्या चर्नीरोडच्या बागेत जाऊन तो वाचत बसे. पण तेवढा अभ्यास अपुरा पडे. रामजीबाबांच्या हे ध्यानी यताच त्याना एक युक्ती

सुचली. रात्री लौकर भीमरावाला ते जेवायला घालीत व आठालाच झोप-वीत. रात्री दोन वाजता सगळे झोपून खोलीत शांतता निर्माण झाल्यावर ते त्याला उठवीत. त्याच्याबरोबर गणिते सोडवीत. त्याच्याकडून ते वाचून घेत. आपल्याकरिता आपले बाबा खूप कष्ट घेतात हे पाहिल्यावर भीमरावाचे कोमल मन गहिवरून येई.

चर्नीरोडच्या बागेत कोणी एक मुलगा नित्यनेमाने येतो आणि एकाग्र मनाने अभ्यास करतो, याचे कुतूहल वाटून त्या रस्त्याने जाणाऱ्या कृष्णाजी अर्जुन उर्फ दादासाहेब केळुसकर नावाच्या एका गुरुजीनी भीमरावाचा परि-चय करून घेतला. त्याची हकीकत ऐकून व त्याची हुशारी पाहून, ज्ञाना-र्जनाची त्याला लागलेली तहान पाहून, ते केवळ थक्कच झाले असे नव्हे तर ते भीमरावाला मदतही करू लागले. पुढे त्यानी रामजीबाबांची ओळख करून घेतली.

भीमरावाचा शिक्षणक्रम असाच चालला असताना तो मॅट्रिकच्या वर्गात आला. त्याने खूप अभ्यास केला. ते वर्ष कसे संपून गेले हे त्याला कळलेच नाही. रिझल्ट लागला. वर्गात त्याचा नंबर पहिला आला.

केळुसकर गुरुजीनी भीमरावाचे हे अपूर्व यश अस्पृश्य समाजातल्या लोकांच्या निदर्शनाला आणून दिले. भीमरावाच्या सत्काराचा कार्यक्रम निश्चित झाला.

अध्यक्षस्थानी थोर समाजसुधारक रावबहादुर श्री. के. बोले हे होते. अध्यक्षांनी सुंदर उपदेश केला. शिक्षणाची महती गायिली केळुसकर गुरुजींना वक्तृत्व बेताचेच होते. त्यांनी आपल्या अल्पशा भावपूर्ण भाषणाच्या शेवटी 'बुद्ध जीवनदर्शन' या नावाचे एक सुंदर पुस्तक भीमरावाला बक्षीस देत म्हटले,

'या महापुरुषाचा अभ्यास कर. तो तुझा सततचा मार्गदर्शक सोबती आहे असे तुला दिसून येईल.'

भीमरावाने ते पुस्तक आपल्या भावी जीवनात वरचेवर वाचले आणि अखेरपर्यंत गुरुजींची प्रेमळ भेट म्हणून जपून ठेवले.

असेच एकदा केळुसकर गुरूजी वेळात वेळ काढून रामजीबावांच्या खोलीवर आले. चहापाणी, क्षेमकुशल झाल्यावर रामजीबाबा म्हणाले,

' गुरूजी, का येणं केलंत ? '

' मुद्दामच आलो. '

' मग बोला. '

' तुमचा भीमराव मॅट्रिक झाला. त्याचं काय करायचं ठरवलंय तुम्ही? '

' काय करायचं ? अहो गुरुजी, त्याचं असं झालंय पोरगा हुशार आणि मॅट्रिक झालेला. त्याला सारख्या पोरी सांगून येत्यात बघा. '

' म्हणजे ? तुम्ही त्याला शिकवणार नाही तर ? '

' अहो, असं कसं व्हईल ? त्याच्या शिक्षणासाठीच तर गाव सोडून मुंबईला नाही का आलो आम्ही ? '

' म्हणूनच म्हणतो मी. '

' अहो, त्याचं लगीन बी करायचं नी शिक्षण बी करायचं. '

' बरं ऽ बरं ! फार होतकरू मुलगा आहे तुमचा. त्याच्या शिक्षणात खंड पडू देऊ नका. येवढंच मला सांगायचंय आणि असं पहा –'

' काय ? कोणतं गुरुजी ? '

' मी आहेच सल्ला मसलतीला, मदतीबिदतीला. काही लागलं सवरलं तर संकोच बाळगू नका. होतकरू मुलांना मदत करणं हे खऱ्या शिक्षकाचं पवित्र कर्तव्य समजतो मी. '

केळुसकर गुरुजी निघून गेले.

भीमरावाचा संसार आणि शिक्षण एकदमच सुरू झाले. नऊ वर्षांची शांत, सुस्वभावी, सोशिक रमा रामजीबाबांची सून म्हणून त्यांच्या घरात आली.

□

१२५६७ ६८।८३

## । ४ ।

भीमराव आंबेडकर आता कॉलेज विद्यार्थी झाले. प्राध्यापक मंडळी त्याना बी. आर. आंबेडकर असे म्हणत, तर त्यांचे वर्गबंधू त्यांना भीमराव आंबेडकर या आदरार्थी नावाने ओळखत.

मधून मधून कॉलेज जीवनात अस्पृश्यतेचे चटके त्याना बसत होते. उच्च वर्णीय विद्यार्थी त्यांच्याशी फटकून वागत होते. त्यांच्यापासून चार पावले ते दूर रहात होते. पण आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने आणि अभ्यासू वृत्तीने त्यांची हुशारी त्यांच्या अन्य मित्रांच्या निदर्शनाला आली. भीमरावानी काढलेली टिपणे त्यांच्या मित्रांच्या अतिशय उपयोगी पडू लागली. त्यामुळे परीक्षेत त्यांना अधिक गुण मिळू लागले. तेव्हा भीमराव हा एक अस्पृश्य जातीचा मुलगा आहे हे सारेजण विसरून गेले. या अनुभवाने भीमरावाने आपल्या मनाशी एक खूणगाठ बांधली की अस्पृश्य मंडळी शिकतील, स्वच्छतेने राहतील आणि आपल्यातील ज्ञानविज्ञानादी गुणांनी इतरांचे नडते आहे हे सिद्ध करून दाखवतील तर अस्पृश्यता नष्ट होईल. त्याना हेही कळून चुकले होते की हा मार्ग तसा सोपा नाही. मृगजळामागे धावण्यासारखा आहे, अशक्य कोटीतला तो आहे.

प्रिव्हीयसची परीक्षा वरच्या श्रेणीमध्ये भीमराव आंबेडकर उत्तीर्ण झाले. ते इंटरच्या वर्गात गेले. इंटरला चार विषय नेमलेले असतात. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करावा लागतो. कित्येक जण तर या परीक्षेत अनुत्तीर्ण होतात आणि कॉलेज सोडून जातात. आंबेडकराना मात्र अभ्यासाची

खरी गोडी इंटरच्या वर्गातच लागली. ते इंटर चांगल्या तऱ्हेने पास झाले. मे महिन्याची सुट्टी त्यानी मजेत घालविली.

जून महिना उजाडला. कॉलेजची प्रवेश फी भरण्याची वेळ आली. त्यानी वडिलांच्याकडे पैसे मागितले कपाळाला आठ्या घालीत मोठ्या कष्टाने रामजीबाबा म्हणाले,

' बेटा, तुला काय सांगावं ?'

' बोला बाबा, कितीही कडू आणि कटू असलं तरी ते ऐकून घेण्याची आणि सहन करण्याची माझ्या मनाची तयारी आहे. बाबा, एक गोष्ट ध्यानी घ्या –'

' ती कोणती ?'

' मी आता अल्लड, पोरकट भीमा राहिलो नाही. बी. ए. च्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणारा एक हुशार भीमराव आंबेडकर नावाचा विद्याव्यासंगी विद्यार्थी आहे. '

' मग सांगून टाकतोच तर. हे बघ, आपली आर्थिक स्थिती आता इतकी बिघडलीय की तुला कॉलेजात नाव घालायला देण्याइतके पैसे मज–जवळ नाहीत. एखादं वर्ष तुला तुझं शिक्षण थांबवावं लागेल. '

' मग त्यात काय मोठंसं ? गरिबी हे पाप नाही, गुन्हा तर नाहीच नाही. बाबा, एक वर्ष या मुंबईत मी शिकवण्या करीन तर दोन वर्षांचा कॉलेजचा खर्चच काय पण घरखर्चालासुद्धा मदत करीन !'

' पोरा, आता दादासाहेब केळुसकर गुरुजींच्याकडे जाऊन येऊ. ते काय म्हणतात ते बघू. '

दुसऱ्याच दिवशी भीमरावाना बरोबर घेऊन रामजीबाबा केळुसकर गुरुजींच्याकडे गेले. त्यानी केळुसकर गुरुजीना सारी हकीकत निवेदन केली. जणू काहीच अडचण नसल्यासारखे दाखवीत सहजतेने केळुसकर गुरुजी म्हणाले,

' रामजीबाबा, काही काळजी करू नका. तुमचा मुलगा मला माझ्या

मुलासारखाच. गरीब व होतकरू मुलांना बडोद्याचे महाराज विद्यावेतन देतात म्हणे –'

'तसं झालं तर मोठीच अडचण दूर होईल.'

भीमराव आंबेडकर केळुसकर गुरुजींचे पत्र घेऊन बडोद्यास गेले. तिथल्या मुलाखतीत केळुसकर गुरुजींच्या शिफारसीप्रमाणे आपण अत्यंत हुशार व होतकरू विद्यार्थी असल्याचे त्यानी सिद्ध करून दाखविले. दरमहा पंचवीस रुपयांची शिष्यवृत्ती बडोदा संस्थानच्या वतीने भीमरावाना मंजूर झाली. आणि या शिष्यवृत्तीच्या जोरावर भीमराव दोन वर्षांत इंग्रजी आणि पर्शियन विषय घेऊन उत्तम रीतीने बी. ए. झाले. मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतूनच बचत करून त्यानी काही अभ्यासाच्या आवडीची पुस्तके खरेदी केली. मधून मधून घरच्या भाजीपाल्यासाठीसुद्धा त्याना हे विद्यावेतन उपयोगी पडले.

बी. ए झाल्यानंतर आणखी पुढे खूप शिकावे अशी भीमरावांची इच्छा होती परंतु घरची आर्थिक ओढाताण पाहून भीमरावानी नोकरी करावी, चार पैसे कमवावेत, प्रपंचाला हातभार लावावा आणि मगच पुढील शिक्षणा–साठी इंग्लंड–अमेरिकेला जावे, असा केळूसकर गुरुजींनी त्याना पोक्त सल्ला दिला.

बडोद्यामध्येच सरकारी कचेरीत एक कारकून म्हणून आंबेडकराना नोकरी मिळण्यास फार वेळ लागला नाही. अत्यंत काटकसरीने राहून ते घरी पैसे पाठवीत. त्यांच्या या पैशामुळे ओढग्रस्तीच्या घराला स्थिरतेचे स्वरूप आले. नोकरीतल्या हुशारीमुळे आंबेडकराना प्रतिष्ठा मिळू लागली. पण नियती ही अशी एक शक्ती आहे की, तिला कुणाचे सुख म्हणून बघवतच नाही.

एके दिवशी नोकरीवर जाण्याच्या गडबडीत असता आंबेडकराना तार आली त्या तारेत मजकूर होता, 'वडील अत्यवस्थ–ताबडतोब निघा.' ऑफि-सात रजेचा अर्ज टाकून मिळणाऱ्या पहिल्याच गाडीने ते मुंबईला जायला निघाले. त्यांच्या भावनाप्रधान स्वभावामुळे आपले वडील आपणाला भेटणा-रच नाहीत अशा कल्पनेमुळे लहानपणापासून आपल्या वडिलांनी आपण मोठे व्हावे म्हणून किती खस्ता खाल्ल्या, किती संकटांना तोंड दिले, ते सारे प्रसंग त्यांच्या नजरेसमोरून जात होते.

विषण्ण मनाने व अत्यंत जड पावलांनी ते घरी आले. आसन्नमरण-स्थितीत असलेल्या रामजोबावानी त्याना ' भीमराव ' म्हणून हाक मारल्यावर भीमरावाना फार फार बरे वाटले. भीमरावानी त्या आजारपणात आपल्या वडिलांची मनापासून सेवा केली. त्याना बरे वाटावे म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण अखेर जे दैवात असते ते माणसाला बदलता येत नाही हेच खरे.

त्या जीवघेण्या आजारातून रामजीबाबा उठू शकले नाहीत आणि भीमराव आंबेडकर मातृछायेची उणीव भासू न देणाऱ्या पितृछायेला कायमचे पारखे झाले.

वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या उत्कट आठवणींनी भीमरावाना महिना दोन महिने अस्वस्थ करून सोडले होते. त्या अवधीत केळुसकर गुरुजीनी मधून मधून त्यांचे सांत्वन केले. अन्य कोणत्याही विषयावर त्यानी बोलणे काढले नाही. परंतु अधिक काळ असे स्वस्थ बसणे योग्य नव्हते. एके दिवशी केळुसकर गुरुजींनी विषय काढला. ते म्हणाले,

' भीमराव, आता काय करायचं ठरवलंयस ? '

' परत बडोद्याला जाऊन नोकरीवर हजर व्हावं असं वाटतच नाही मला. '

' मग तुझ्या मनात काय आहे ? '

' वडिलांची इच्छा पूर्ण करणं. मला खूप खूप शिकवून मोठ्ठं करायचं होतं त्याना. मला जर अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा इत्यादींच्या अभ्यासासाठी इंग्लंडला जायला मिळेल तर –'

' बोल ना थांबलास का ? '

' गरिबांचे मनोरथ मनात येतात आणि मनातच विरतात हेच खरं. '

' उघड उघड काय ते सांग. आडपडद्याच्या गोष्टी नकोत. '

' मला इंग्लंड किंवा अमेरिकेला जावंसं वाटतं. '

' अरे, मग त्यात काय मोठंसं ? करू ना आपण तशी खटपट. '

बडोद्याचे दानशूर सयाजीराव महाराज गायकवाड यांचा मुक्काम त्यावेळी मुंबईच्या वाड्यातच असल्याचे केळुसकर गुरुजीना कळले. त्यानी

महाराजांची गाठ घेतली आणि आंबेडकरांची इच्छा त्यांच्या कानी घातली. महाराज म्हणाले,

' जातिभेदाचा विचार न करता हुशार विद्यार्थ्यांना परदेशात पाठ-वून शिकून आणणं हे आमच्या संस्थानचं धोरण आहे आणि आम्ही आंबेड-करांना दोन वर्षांकरिता संस्थानच्या खर्चानं अमेरिकेला पाठवू. '

केळुसकर गुरुजीना आनंद झाला. ते नम्रतापूर्वक उत्तरले,

' महाराज, फार फार उपकार होतील त्या पोरावर. याची मी खात्री देतो की, पोरगा तुमच्या पैशाचं चीज केल्याशिवाय राहणार नाही. '

पण मिस्किलपणे गालातल्या गालात हसत सयाजीराव महाराज म्हणाले,

' हे पहा गुरुजी, शिकून आल्यानंतर तुमच्या त्या आंबेडकरानं आमच्या संस्थानची दहा वर्षं नोकरी करायला हवी. '

' करील ना ? अहो, ही तर दुधात साखर. शिकायलाही मिळालं आणि नोकरीही मिळाली. शिकून आल्यावर नोकरीसाठी वणवण हिंडायला नको. '

केळुसकर गुरुजींनी सयाजीराव महाराजांच्याबरोबर झालेले बोलणे भीमरावांना सांगितले. बडोद्याला जाऊन तेथे त्यांनी रीतसर अर्ज केला. दोन वर्षांचा करार करून आणि पुढे दहा वर्षांच्या नोकरी करण्याच्या अटीला मान्यता देऊन ते मुंबईला परत आले.

१९१३ च्या जुलै महिन्यात आंबेडकरांनी न्यूयॉर्कला जाण्यासाठी मुंबई सोडली.

| ५ |

---

१९१३ साली आंबेडकर अमेरिकेला गेले. कोलंबिया विद्यापीठात त्यानी आपले नाव दाखल केले. अमेरिकेतले मोकळे वातावरण त्याना अतिशय आवडले आणि मानवलेही. अस्पृश्य म्हणून किंवा इंडियन म्हणून त्यांची कोणीच हेटाळणी केली नाही. अब्राहम लिंकन, बुकर टी वॉशिंग्टन, इमरसन, थोरो या उदारमतवादी नेत्यांनी घडविलेला तो प्रगत देश होता. महिन्याच्या महिन्याला बडोद्यातून त्यांना विद्यावेतन मिळत होते. तेवढ्या विद्यावेतनात इतर विद्यार्थ्यांच्याप्रमाणे गुजारा करणे त्याना कठीण जात होते. अत्यंत साधे जेवण आणि दोन वेळचा चहा या पलीकडे तिथल्या दोन वर्षांच्या काळात आंबेडकरानी काही घेतले नाही. तसेच अभ्यासाचा वेळ सोडून गरजे-साठी काही तरी काम करून चांगल्या प्रकारे गुजारा करावा असा विचा-रही त्यांच्या मनात आला नाही. तेथील भव्य ग्रंथालयावर ते एवढे बेहद्द खूष होते की, अठरा अठरा तास वाचन करूनही त्यांचे समाधान होत नसे. ग्रंथ-पालाने ग्रंथालय उघडण्यापूर्वी ते ग्रंथालयाच्या दारात उभे असत. ग्रंथालय बंद करण्याची वेळ झाली आहे अशी सूचना ग्रंथपालाला त्याना द्यावी लागे. एकापेक्षा एकेक सरस, सुरस आणि मौल्यवान ग्रंथ पाहून भारतात गेल्यावर हे ग्रंथ आपण खरेदी करून आपले स्वत:चे स्वतंत्र ग्रंथालय सजवावयाचे अशी आकांक्षा त्यांच्या मनात बळावली आणि पुढे त्यानी तसे करूनही दाखविले.

१९१६ साली ते एम्. ए. झाले. आणि लगेच पुढच्याच वर्षी ते पीएच्. डी. झाले. कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आणखी

एखादे वर्ष आपल्याला अमेरिकेत राहायला मिळावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती.

बडोद्याच्या दिवाणानी कराराप्रमाणे विद्यावेतनाची मुदत संपल्या–बरोबर त्याना परत बोलावून घेतले आणि नोकरीवर हजर राहण्याचा हुकूम दिला.

अकौंटन्ट जनरल असा एक जबाबदार प्रतिष्ठित अधिकारी म्हणून आंबेडकर बडोद्याला हजर झाले. त्यांच्यापुढे प्रश्न होता राहाण्यासाठी जागा मिळविण्याचा. आपली अस्पृश्यता पुन्हा डोकावणार तर नाही ना, याची त्याना सतत शंका येत होती. त्यांची शंका अखेर खरी ठरली. त्यांची जात महार आहे, हे समजताच त्याना कोणी जागा द्यायला तयार होईनात आज एका लॉजमध्ये तर उद्या दुसऱ्या, असे त्यांचे दिवस चालले. ऑफिसात हजर होण्यापूर्वी आंबेडकर या नावाच्या एका अस्पृश्य अधिकाऱ्याची नियुक्ती झाली आहे, ही बातमी त्यांच्या ऑफिसातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून तो पार कनिष्ठ शिपायांपर्यंत पोहोचली होती. त्यानी ऑफिसात प्रवेश करताच शिपा-यांनी जाजम गुंडाळायला प्रारंभ केला. त्यांचा विटाळ होऊ नये म्हणून कार-कून त्याच्या अंगावर दुरूनच कामाच्या फायली फेकू लागले. आंबेडकर धीर, गंभीर, शांत म्हणून त्यांनी हे सर्व सहन केले. एका पारश्याच्या वसतिगृहात आपली खोटी जात सांगून ते खोली घेऊन राहिले. पण त्यांची खरी जात त्या पारश्याला कळताच तो खवळला. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.आंबेडकरांच्या खोलीच्या दाराशी तो ओरडतच गेला. त्याने आंबेडकरांना बाहेर बोलावले. आंबेडकर बाहेर येऊन शांतपणे म्हणाले,

'काय हवंय आपल्याला ?'

'तुमची जात काय ?'

'मी हिंदू आहे.'

'कसला हिंदू ?'

'मी अमेरिकेहून एम्. ए. पीएच. डी. होऊन परत आलेला एक प्रतिष्ठाप्राप्त हिंदू अधिकारी आहे.'

'खोटं बोलू नका. तुम्ही महार आहात. आम्ही आमच्या बोर्डिंगात महारांना ठेवीत नाही. तावडतोव चालते व्हा. अस्पृश्यांना आम्ही बोर्डिंगात जागा देऊ तर बोर्डिंगचं दिवाळं काढून गाशा गुंडाळून, आम्हाला मुंबईला जावं लागेल.'

खोलीतील सामान घेऊन आंबेडकर बाहेर पडले. पदोपदी जिथे अस्पृश्य म्हणून आपला अपमान होतो त्या शहरात आपण राहायचेच नाही असे त्यानी ठरविले. त्यानी नोकरीचा राजीनामा दिला आणि ते मुंबईला परत आले.

आंबेडकर खरे अर्थतज्ज्ञ असल्यामुळे त्यानी रोखे हुंड्या यासारखी कामे करणारी व अशिलांना अर्थविषयक सल्ला देणारी एक पेढी काढली. त्यांचा सल्ला योग्य आणि अशिलांना फायदेशीर ठरत असल्यामुळे त्यांच्या पेढीवर गरजूंची गर्दी होऊ लागली. पण कालांतराने ते अस्पृश्य आहेत, हे त्या अशिलांना कळताच आंबेडकरांची पेढी रोडावू लागली. परिणामी ती त्याना कायमचीच बंद करावी लागली.

१९१८ चा नोव्हेंबर महिना होता तो. ते नोकरीसाठी शोधाशोध करू लागले. सिडनहॅम कॉलेजात त्याना राज्यशास्त्राच्या आणि अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाची नोकरी मिळाली. प्रत्यक्ष सिडनहॅम यानीच त्यांची शिफारस केली. आंबेडकरानी आपल्या विद्यार्थ्यांना जीव तोडून शिकविले. त्यांच्या वक्तृत्वाचा आणि विद्वत्तेचा प्रभाव विद्यार्थीवर्गावर इतका पडला की, तिथे त्यांची जात आडवी आली नाही. विद्यार्थी आपआपसात कुजबुजत, असेनात का अस्पृश्य, ब्राह्मणातसुद्धा एवढा विद्वान प्राध्यापक सापडायचा नाही.

आता त्यांचे बरे चालले होते.

त्याना एक मुलगाही झाला होता. त्याचे नाव होते यशवंत. यशवंत आपल्या वडिलांना बाबा म्हणे. तेव्हापासून आंबेडकरांचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे रूढ झाले.

त्या काळात बाबासाहेबानी विलक्षण वाचन केले. ते अत्यंत काट-कसरीने राहिले. त्यांच्या पत्नीने – माऊली रमाबाईने – टुकीने संसार करून आपल्या पतीस काही कमी पडू दिले नाही. यशवंताचे किरकोळ आजार-

सुद्धा तिने परस्पर निभावून काढले. ते आपल्या नवऱ्याच्या कानी घातले नाहीत.

एके दिवशी एक आनंदाची बातमी घेऊन बाबासाहेब रमाबाईंकडे आले. ते म्हणाले,

' रमा – '

' मोकळ्या मनानं बोलायला आज बरी सवड मिळाली? ' रमाबाई उत्तरली.

' आज मी खूप खूप खुष आहे. '

' कारण तर सांगा. '

' त्याचं असं आहे. फार काटकसरीनं मी वागलो आणि चार पैसे साठविले. मला इंग्लंडला जायचंय. तिथं अर्थशास्त्राचा, राज्यशास्त्राचा विशेष अभ्यास करायचाय. '

' पण साठलेल्या पैशात जमेल का सगळं ? '

' तीच तर अडचण होती. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी मला मदत देऊ केली आहे आणि एक मित्र नवल भथना याने आणखी काही लागतील तर उसने पैसे द्यायचे कबूल केले आहे. '

' कित्ती कित्ती छान झालं बाई ! फार दिवसांची तुमच्या मनातली इच्छा आता पुरी होईल. खूप अभ्यास करा. मोठ्ठं आणि शहाणं होऊन या. आमची काळजी मुळीच करू नका. तरीपण आमचे डोळे तुमच्या वाटेकडेच लागलेले असतील. '

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा,
बाल वाङ्मय विभाग
ग्रा. क्र. ........ दि. कि .......
विषय .............. क्र. ..........

□

## । ६ ।

पूर्ण तयारीनिशी बाबासाहेब इंग्लंडला गेले. तेथे त्यानी अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केला. शिवाय बॅरिस्टरीच्या टर्म्स ते भरतच होते. ब्रिटिश म्युझियममध्ये त्यानी आपले नाव घातले. कारण पुस्तके विकत घ्यायला त्यांच्याजवळ पैसा नव्हता. ब्रिटिश म्युझियममधील सुसज्ज ग्रंथालयाचा, हावरट लांडग्याने आपल्या भक्ष्यावर ताव मारावा तसा फायदा आंबेडकरानी उठविला. ते सकाळी ग्रंथालयात येत ते सायंकाळ होईपर्यंत वाचत बसत. तेथील आपल्या दिनचर्येबद्दल एका मित्राच्या पत्रात ते लिहितात,

'मी जिच्याकडे रहात आहे,ती बाई सकाळी न्याहरीला मला काय देत असेल असं वाटतं? एक माशाचा तुकडा, एक कप चहा, एक पावाचा तुकडा आणि गणपतीच्या कपाळाला गंधाची टिकली लावतात ना तेवढा जॅम! असलं कदान्न खाऊन मी म्युझियममध्ये वाचायला जातो. दुपारचे जेवण घ्यावयास माझ्याजवळ पैसे नाहीत. तसाच अर्धपोटी मी पाच वाजेपर्यंत वाचत बसतो. घरी आल्यावर संध्याकाळचं जेवण. ते म्हणजे एक कप बॉव्हरिन आणि बटर बिस्किटं. नंतर पुन्हा वाचन. रात्री दहाला कडकडून भूक लागे. मग मी काय खातो, तर माझ्या एका मित्रानं मला एक पापडांची करंडी दिली आहे. पापड भाजण्यासाठी एक पत्र्याचा तुकडा कुठून तरी मी पैदा केला आहे, तो माझा तवा. त्यावर भाजलेले चार पापड आणि कपभर दूध हे माझे रात्रीचे अन्न... असा राहून अठरा अठरा तास अभ्यास करीत आहे मी.'

एकदा दुपारच्या वेळी बाबासाहेबानी ग्रंथालयात टेबलावर थोडी न्याहारी केली. हे शिपायाने पाहिले. त्याने ग्रंथपालाकडे तक्रार केली. ग्रंथपालाने बाबासाहेबाना आपल्या ऑफिसात बोलावले आणि टेबलावर बसून न्याहारी केल्याबद्दल ग्रंथालय सोडण्याची आज्ञा केली. हे भलतेच संकट उद्भवलेले पाहून बाबासाहेब अगदी हवालदिल झाले. ते नम्रतापूर्वक ग्रंथपालाना म्हणाले,

‘ ग्रंथालयात काही न खाण्याचा नियम मी मोडला आहे माझी चूक झाली. मी क्षमा मागतो. पण –!’

‘ पण काय मि. आंबेडकर ? बोला.’

‘ मी मोठ्या अगतिक परिस्थितीत राहात आहे. उदारमनानं तुम्ही मला सांभाळून घ्यावं. ’

आपल्या दारिद्र्याची दर्दभरी कहाणी बाबासाहेबानी ग्रंथपालाला निवेदन केली.

त्याचे मन द्रवले. तो म्हणाला,

‘ मि. आंबेडकर, तू आता असं कर. ’

‘ सांगा मी काय करू ? तुम्ही सांगाल तसं करायला मी तयार आहे.’

‘ माझ्या ऑफिसमध्ये रोज तू जेवायला येत जा. ’

दुसरे दिवशी आपली न्याहारी घेऊन ग्रंथालयाच्या ऑफिसात आंबेडकर गेले. त्यांचे अन्न पाहून ग्रंथपालाच्या डोळ्यात आसवे तरळली. तो त्याना आपल्यातले जेवण रोज देऊ लागला. उदारमनाचा त्याचा आग्रह बाबासाहेबाना मोडवला नाही

या निमित्ताने ग्रंथपालांची आणि त्याची चांगलीच गट्टी जमली. चार प्रतिष्ठित प्राध्यापकांचा परिचय होण्यास या मैत्रीचा बाबासाहेबाना फायदा झाला.

१९२३ साली अर्थशास्त्रज्ञ आणि एक हुशार बॅरिस्टर बनून बाबासाहेब आंबेडकर भारतात आल्यावर पुन्हा काय करायचे हा प्रश्न त्यांच्यापुढे उत्पन्न झाला. त्यानी मनात आणले असते तर एखादी चांगली नोकरी त्याना सहज

मिळाली असती, पण नोकरीत होणाऱ्या कुचंबणेचा त्यानी आपल्या गतजीवनामध्ये पुरेपूर अनुभव घेतला होता. आपल्यासारख्या विद्याविभूषित तरुणाची जर या समाजात एवढी दु:स्थिती तर आपले दलित बांधव किती अपमानित अवस्थेत जीवन कंठीत असतील याची कल्पना त्यांना करवेना.अस्पृश्यांचा उद्धार अस्पृश्यांनीच केला पाहिजे, हे महान तत्त्व त्यांच्या चांगलेच पचनी पडले होते. म्हणून त्यानी वकिली करावयाचे ठरविले.

त्याना वकिली करायची होती, जिथे जिथे अन्याय घडत आहे, तिथे तिथे न्यायाची स्थापना करण्यासाठी. सवर्ण अस्पृश्यांना छळत आहेत, श्रीमंत गरिबांना छळत आहेत, तसेच पुरुष स्त्रियांना छळत आहेत असा हा त्रिविध छळवाद नाहीसा करण्याचे वकिली हे एकमेव प्रभावी साधन आहे, असे त्यांच्या मनाने घेतले.

त्यानी सनद काढली.त्याना पैसेही बरे मिळू लागले. अस्पृश्यांच्या उद्धाराचे काम अल्पस्वल्प प्रमाणात पण परिणामकारकतेने घडू लागले. पण एवढ्याने त्यांच्या आकांक्षी मनाचे समाधान होईना.

अस्पृश्यांच्या अडचणी त्यानी जशा अस्पृश्यांच्यापुढे मांडल्या तसेच त्यानी सरकारपुढे आपली बाजू मांडायला प्रारंभ केला. आंबेडकराना या त्यांच्या कामात थोर समाजसेवक रावबहादुर श्री. के. बोले यांची मदत होत होती. आंबेडकरांच्या पाठिंब्याने श्री. के. बोले यानी सरकारातून एक बिल पास करून घेतले – ‘सरकारी मदत मिळणाऱ्या संस्थेमध्ये अस्पृश्यांना प्रवेश नाकारता येणार नाही.’ सनातनी हिंदू लोक चिडू लागले. पण आंबेडकरांच्या कार्याला आता धार चढू लागली. त्यानी एका सभेची स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी असे तिचे नाव. या सभेमार्फत शाळा, वसतिगृहे, मोफत वाचनालये त्यानी सुरू केली.

आंबेडकरांच्या या कार्याकडे मुंबई सरकारचे लक्ष होते. आंबेडकरांची महती सरकारला पटली आणि कायदे मंडळावर आंबेडकर यांची नियुक्ती झाली. आंबेडकरांचे सर्वत्र अभिनंदन होऊ लागले. साऱ्या अस्पृश्यांना असे वाटू लागले की आपल्याला आता उद्धारकर्ता मिळाला.

मार्च १९२७ साली महाडला अस्पृश्यांनी एक परिषद भरविली आणि

अध्यक्षपदाची माळ अर्थातच आंबेडकरांच्या गळ्यात पडली. अध्यक्षपदावरून आंबेडकरानी जो संदेश दिला, तो अत्यंत मोलाचा होता. ते म्हणाले –

'मनातल्या उच्च–नीचतेच्या कल्पना आपण काढून टाकायला हव्यात. आपण स्वावलंवनाची कास धरली पाहिजे. स्वावलंबनावाचून आत्मोद्धार नाही. हक्क हे मागून मिळत नाहीत. ते झगडून घ्यावे लागतात. झगडायला, लढा करायला आपण तयार झाले पाहिजे.'

आंबेडकरांच्या या विचारसरणीला त्यांच्या अस्पृश्य बांधवांनी एकमुखी पाठिंवा दिला. आंबेडकरांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रह जाहीर केला. कायद्याने ते तळे अस्पृश्यांच्यासाठी पूर्वीच खुले झाले होते. परंतु सनातन्यांना घाबरून कोणी त्या पाण्याला स्पर्श केला नव्हता. आपले शेकडो अस्पृश्य बरोबर घेऊन आंबेडकर त्या तळ्याचे पाणी गटागटा प्याले. आणि साऱ्या अस्पृश्यांना त्यानी पाणी प्यायला लावले.

या प्रकाराने सनातनी भडकून गेले. आपले तळे भ्रष्ट झाले म्हणून ते चिडले. अस्पृश्यांवर त्यांनी तुफानी दगडफेक केली. आंबेडकरांच्याकडे जशास तसे अशा प्रतिकाराची परवानगी त्यांच्या अस्पृश्य बांधवांनी मागितली. परंतु अस्पृश्यांना संयम राखायला लावून आंबेडकरानी रक्तपात टाळला.

आपल्या विचारांची माहिती अन्यत्र झाली पाहिजे, म्हणून त्यांनी एक वृत्तपत्र सुरू केले. नाशिकच्या राममंदिरात आपण प्रवेश करणार आहोत, अशी त्यानी घोषणा केली. काही लोकांच्या मध्यस्थीने सवर्णांबरोबर अस्पृश्यांनीही रामाचा रथ ओढावा, असा मध्यस्थ मार्ग काढला. पण यात सवर्णांनी आंबेडकरांना पूर्णतः फसविले. मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह सुरू झाला. एक वर्षभर प्रभू रामचंद्र आपल्या भक्तांना मुकला होता. सत्याग्रहींच्यावर दगडफेक झाली परंतु हिंसेला आंबेडकरांनी अहिंसेने उत्तर दिले. त्यामुळे त्यांची कीर्ती मुंबई इलाख्याची सरहद्द ओलांडून भारतभर पसरली.

१९३० साल उजाडले. गांधीजींची भारतीय स्वातंत्र्याची चळवळ वेग घेऊ लागली. भारतियांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी भारत सरकारने लंडन–मध्ये एकूण तीन गोलमेज परिषदा भरविल्या. तिन्ही परिषदांत आंबेडकरांची

शासनाकडून अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पहिल्या गोलमेज परिषदेतल्या त्यांच्या भाषणाने गांधीजीसुद्धा प्रभावित झाले. आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले,

'भारतातून इंग्रज सत्ता जाऊन त्या जागी भारतीय लोकशासन आले पाहिजे. या मागणीला माझ्या दलित बांधवांचा पूर्ण पाठिंबा आहे. दीडशे वर्षे ब्रिटिशांनी भारतावर राज्य केले. अस्पृश्यांच्या दुःखस्थितीत काहीच सुधारणा झाली नाही.'

दुसऱ्या गोलमेज परिषदेतही आंबेडकरानी प्रभावी भाषण केले. आपल्या भाषणातून त्यांनी गर्जना केली की,

'दलितांच्याकरिता स्वतंत्र मतदार संघाची मी मागणी करतो. हिंदुधर्माने आम्हाला अपमान, दारिद्र्य आणि मानहानी याशिवाय दुसरे काही दिले नाही.'

या परिषदांतून काहीही फलनिष्पत्ती झाली नाही. पण आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने भारताच्या सीमा ओलांडून इंग्लंडच्या लोकांना प्रभावित केले.

एकदा गांधीजीनी आंबेडकराना भेटण्यासाठी बोलाविले. गांधीजी म्हणाले,

'आंबेडकर, तुम्ही एक सच्चे देशभक्त आहात, याबद्दल माझ्या मनात काहीही शंका नाही. तुम्ही मागता ती समता या भारतात निर्माण झाल्या-शिवाय खऱ्या अर्थाने भारत देश स्वतंत्र झाला असे मी मानायला तयार नाही.'

एखाद्या मंदिरात भक्तांनी गर्दी करावी तसे आंबेडकरांच्या घराला स्वरूप आले होते. ते वाणीने आणि लेखणीने अस्पृश्यांचा असंतोष सर्वत्र समजावून सांगत होते.

अखेर सरकारने त्यांच्या मागणीप्रमाणे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ बहाल केला.

सर्वत्र आसेतूहिमाचल अस्पृश्यांनी आणि अस्पृश्यांच्या कैवाऱ्यांनी आंबेडकरांच्या या यशाबद्दल त्यांचे मोठचा मोठचा सभा भरवून अभिनंदन केले. त्यांना धन्यवाद दिले.

पण हा स्वतंत्र मतदार संघ महात्माजींना मान्य नव्हता. यातून सवर्ण आणि अस्पृश्य यांची कायमची ताटातूट होईल आणि त्याचे रूपांतर भारताची शकले होण्यात होईल अशी भीती महात्माजींना वाटत होती. स्वतंत्र मतदार संघाविरुद्ध गांधीजींनी पुण्यात प्राणांतिक उपोषणास प्रारंभ केला. सारा देश गांधीजींच्या या उपोषणाने ढवळून निघाला. गांधीजींचे म्हणणे तात्त्विक आणि नैतिक दृष्ट्या बरोबर आहे असे अनेकांना वाटले. हजारो वर्षे पददलित म्हणून जनावरांचे जीवन जगणाऱ्या अस्पृश्यांना काही तरी मिळत होते, असेही अनेकांना वाटले. गांधीजींनी माघार न घेण्याचे ठरविले. त्यांचे प्राण धोक्यात येत आहेत, असे दिसताच काही नामवंत मध्यस्थांनी आंबेडकरांची आणि गांधीजींची भेट घडवून आणली. गांधीजी म्हणाले,

'आपण सर्वजण अविभक्त राहिले पाहिजे. हिंदूधर्माला भूतकाळातील त्याच्या पापांचे क्षालन करण्याची संधी आंबेडकरांनी द्यावी.'

अस्पृश्यांना अधिक जागांचे प्रतिनिधित्व देण्याच्या अटीवर हे विभाजन टळले आणि गांधीजींचे उपोषण समाप्त झाले.

□

# । ७ ।

राजकारणामध्ये हिरीरीने आंबेडकर भाग घेत होते. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू अस्पृश्योद्धार होता. तरी त्यांचा खरा पिंड विद्याव्यासंगाचा होता.

फावल्या वेळात त्यांचे वाचन चालू असे. ते नेहमी नवी नवी पुस्तके विकत घेत. त्यांचा ग्रंथसंग्रह आता पन्नास हजारांवर होता. मुंबईत दादरला एक प्रशस्त बंगला त्यांनी बांधला. त्याला नाव दिले 'राजगृह.' इंग्लंडमध्ये असताना सर विन्स्टन चर्चिल यांना भेटण्यासाठी ते गेले होते.

चर्चिलचा विद्याव्यासंग प्रचंड होता. ग्रंथ ठेवण्याची त्यांची कपाटे आंबेडकरांना खूप आवडली. तशा पद्धतीची कपाटे त्यानी आपल्या खाजगी ग्रंथालयात करून घेतली.

मनाला विरंगुळा मिळावा म्हणून ते नेहमी बुद्धाचे जीवनचरित्र वाचीत आणि त्यामुळे त्याना मनःशांतीचा लाभ होई. बुद्धाच्या जीवनावर आणि शिकवणुकीवर लिहिलेले अनेक टीकाग्रंथ त्यांच्या संग्रही होते. त्याना बरचेवर वाटे की, बुद्धाचा धर्म शुद्ध समतेवर आधारलेला आहे. बौद्ध धर्मात जातिभेद नाही.

१९३५ च्या सुमारास आंबेडकरांची गृहलक्ष्मी, त्यांची प्रिय पत्नी रमाबाई निवर्तली. त्या माऊलीने आंबेडकरांचा संसार सांभाळला म्हणूनच राजकारणात, समाजकारणात आंबेडकर पूर्णांशाने रमू शकले. आंबेडकर भावनाप्रधान असल्यामुळे त्याना रमाबाईंच्या आठवणी जवळजवळ दोन वर्षे अस्वस्थ करून सोडत होत्या.

पुणे करारामुळे गांधीजींचे प्राण वाचले. साठाच्या ऐवजी दलितांना एकशेअठ्ठेचाळीस जागा मिळाल्या. तरी अखेर हे दलित उमेदवार दलितेतर मतदारांच्या दावणीला बांधले गेले होते. आंबेडकरानी आपले हे अपयशच मानले.

दलितांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी आंबेडकर सातत्याने धडपडत होते. त्यांच्या या कार्याकडे फारच थोडया सवर्ण हिंदूंनी सहानुभूतीने पाहिले. आंबेडकरांना या गोष्टीची मोठी चीड येई.

अस्पृश्यांच्या येवले परिषदेत त्यांनी विचारान्ती जाहीर करून टाकले–

' मी हिंदू म्हणून जन्माला आलो हा माझा अपराध नव्हे. परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही. हा हिंदुधर्म आम्हां अस्पृश्यांना माणूस म्हणून ओळखत नाही. तो आम्हांला अडाणी आणि गरीबच ठेवू इच्छितो. हिंदुधर्म हा धर्म नसून ते एक महान संकट आहे. '

१९३५ च्या निवडणुकीत आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मुंबई असेंब्लीवर आंबेडकर आणि त्यांचे चौदा सहकारी प्रचंड बहुमताने निवडून आले.

१९३९ साली दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. १ जुलै १९४२ मध्ये व्हॉईसरॉयनी आपल्या कार्यकारी मंडळावर मजूर मंत्री म्हणून आंबेडकरांची नियुक्ती केली. या नियुक्तीने ठिकठिकाणी त्यांच्या अभिनंदनाच्या सभा झाल्या. प्रत्येक सभेत उत्तरादाखल आंबेडकर सांगत आले –

' माझा जन्म गरिबीत झाला. गरिबांची दु:खे, त्यातही अस्पृश्य गरिबांची दु:खे मी अनुभवली आहेत. ती दूर कशी होतील या भोवतीच माझे कार्यक्षेत्र सतत कार्यरत राहील. '

१९४५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत आंबेडकरांना अपयश आले. त्यांनी सरकारला सहकार्य दिले होते म्हणून मतदार त्यांच्यावर रागावले.

१९४६ मध्ये घटना समितीवर ते निवडून आले.

घटना समितीच्या एका अधिवेशनात अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा होय असा ठराव त्यानी संमत करून घेतला.

१९४६ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरूनी महात्माजींच्या आग्रहास्तव भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून आंबेडकराना सन्मानपूर्वक आपल्या मंत्रिमंडळात घेतले.

डॉ. राजेंद्रप्रसादांच्या अध्यक्षतेखाली घटना समिती कार्य करू लागली. त्या समितीत आंबेडकरानी एकापेक्षा एक आणि विद्वत्ताप्रचुर भाषणे केली. घटना तयार करणाऱ्या उपसमितीचे अध्यक्षपद डॉ. राजेंद्रप्रसादानी आंबेडकराना दिले आणि भारतासारख्या जगातील सनातन व लोकशाहीप्रधान राष्ट्राची घटना तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.

अत्यंत कष्ट करून, रात्रीचे दिवस करून आंबेडकरांनी भारतीय घटनेचा मसुदा तयार केला आणि अवलोकनासाठी तो डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडे रवाना केला. या कामाच्या ताणामुळे आंबेडकर आजारी पडले. मुंबईच्या एका रुग्णालयात ते उपचारासाठी आले. तेथे डॉ. शारदा कबीर यांच्याशी त्यांचा परिचय झाला. डॉ. शारदाबाईंनी आंबेडकरांची आपलेपणाने शुश्रूषा केली.

एप्रिल १९४८ मध्ये आंबेडकरांनी डॉ. शारदाबाईंशी विवाह केला.

घटनेच्या संदर्भात आंबेडकर एके ठिकाणी लिहितात –

जातिभेदाचा त्याग केला तरच भारत एक सबल राष्ट्र बनेल.

२६ नोव्हेंबर १९४९ च्या घटनासमितीच्या महत्त्वपूर्ण सभेत आंबेडकरानी तयार केलेली घटना भारताने स्वीकृत केली.

२६ जानेवारी १९५० रोजी एक सन्मानपूर्वक प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून भारत पृथ्वीच्या पाठीवर अवतरले.

□

## । ८ ।

आंबेडकरांच्या वयाला आता साठ वर्षे पुरी होत आली होती. त्यांचे तगडे शरीर अतिश्रमाने खिळखिळे होत होते. मधून मधून त्याना थकवा जाणवत होता. राजकारणातून बाजूला सरकून आपल्या दलित बांधवांनाच मार्गदर्शन करावे हा विचार त्यांच्या मनात तीव्रतेने घोळत होता.

सिलोन येथे भरणाऱ्या बौद्ध परिषदेचे आंबेडकराना आमंत्रण आले. ते सिलोनला गेले. तेथे त्यानी अनेक विचारपरिप्लुत भाषणे ऐकली. लोकाग्रहास्तव त्यांनीही एक भाषण केले. ते आपल्या भाषणात म्हणाले –

'बौद्धधर्माच्या उदात्त तत्त्वांमुळे मी प्रभावित झालो आहे. बौद्धधर्माचा स्वीकार हा आम्हा अस्पृश्यांच्या दुःखविमोचनाचा एकमेव मार्ग आहे, बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन व्हावे यासाठी माझे उर्वरित आयुष्य खर्च करण्याचे मी जाहीर करतो.'

तेथून पुढे आंबेडकरानी अंतकाळापर्यंत सामाजिक अन्याय आणि वेडगळ धार्मिक समजुती यांच्याविरुद्ध वाणीने आणि लेखणीने प्रचंड लढा पुकारला.

पुढे नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बुद्धाच्या २५०० व्या जयंतीनिमित्त बौद्ध संत चंद्रमणी यांच्या हस्ते आंबेडकरानी बौद्ध धर्म स्वीकारला. नंतर आपल्या तीन लाख अस्पृश्य बांधवांना त्यांनी स्वतःच बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

यानंतर दोनच महिन्यांनी दिल्लीतल्या आपल्या निवासस्थानी आंबेडकर आजारी पडले. बरे वाटल्यावर ठिकठिकाणी भारतभर दौरा काढून आपल्या

पाच कोटी अस्पृश्य बांधवांना बौद्धधर्माची दीक्षा देण्याचा संकल्प त्यानी सोडला होता. पण नियतीच्या मनात काही निराळेच होते. त्या अल्पशा आजारातच अनपेक्षितरित्या ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीत आंबेडकरांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनाची वार्ता ऐकून अंत्यदर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी सर्व थरांतील आबालवृद्धांची रीघ लागली. त्यात भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू होते. त्यांचे मंत्रिमंडळही होते.

७ डिसेंबरला विमानाने त्यांचे शव मुंबईला आणण्यात आले.

दोन मैल लांबीच्या अभूतपूर्व अशा अंत्ययात्रेत असंख्य लोक आपल्या अनावर अश्रूंना मुक्तपणे वाट देत होते. लोकमान्य टिळकांच्या नंतर मुंबई नगरीने इतक्या लांबीची अशी भावपूर्ण अंत्ययात्रा दुसरी पाहिली नाही.

मृत्यूसमयी आंबेडकरांच्या तोंडून अस्पष्ट असे उद्‌गार बाहेर पडत होते –

'बुद्धं शरणं गच्छामि ।'

याच मंत्राच्या घोषात ती प्रचंड अंत्ययात्रा चालली होती.

त्यांच्या मृत्यूने भारतालाच नव्हे, तर साऱ्या जगाला मोठा धक्का बसला.

जगातल्या कानाकोपऱ्यातून त्याना गौरवपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आल्या.

□

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवनपट

| | |
|---|---|
| १८९१ | जन्म ( १४ एप्रिल ) |
| १९०८ | मॅट्रिक |
| १९१२ | बी. ए. |
| १९१५ | एम. ए. ( अमेरिका ) |
| १९१७ | अकौंटन्ट जनरल, संस्थान बडोदे |
| १९१८ | नोकरीचा राजीनामा |
| १९१९ | प्राध्यापक ( सिडनहॅम कॉलेज ) |
| १९२० | इंग्लंडला प्रयाण |
| १९२२ | एम्. एस्सी., डी. एस्सी. व बॅरिस्टर |
| १९२३ | वकिलीस सुरवात |
| १९२७ | कायदेमंडळावर निवड |
| १९३० | मंदिरप्रवेश सत्याग्रह ( नासिक ) |
| १९३० ते ३२ | गोलमेज परिषदांना उपस्थिती |
| १९३५ | सौ. रमाबाईंचे निधन |
| १९३५ | धर्मांतर घोषणा ( १३ ऑक्टोबर ) |
| १९३७ | कायदेमंडळावर निवडून आले |
| १९४२ | मजूर आणि बांधकाम मंत्री (केंद्रीय मंत्रिमंडळ) |

| | |
|---|---|
| १९४६ | सिद्धार्थ कॉलेज स्थापना (मुंबई) |
| १९४७ | कायदामंत्री (केंद्रीय मंत्रिमंडळ) |
| १९४८ | डॉ. शारदा कबीर यांच्याशी दुसरा विवाह |
| १९५० | तयार केलेल्या घटनेस मंजुरी |
| १९५१ | मंत्रिपदाचा त्याग (२७ सप्टेंबर) |
| १९५२ | अमेरिकेत व्याख्यानदौरा |
| १९५३ | सन्मान्य डॉक्टरेट (उस्मानिया विद्यापीठ) |
| १९५४ | हीरक महोत्सव (मुंबई) |
| १९५६ | बौद्धधर्म – प्रवेश (१ लाख अनुयायांसह) (१४ ऑक्टोबर) |
| १९५६ | दिल्लीत आकस्मिक देहावसान (६ डिसेंबर) राष्ट्रीय नेत्यांची श्रद्धांजली. |
| १९५६ | प्रचंड अंत्ययात्रा (७ डिसेंबर) |

शाखा.
दि. १४५५७ ६।८।८३

# गौरवांजली

दीनदलितांच्या उद्धारासाठी आंबेडकरानी फार मोठी कामगिरी केली.

**डॉ. राजेंद्रप्रसाद**

डॉ. आंबेडकर दलितवर्गाच्या उद्धारासाठी आमरण झगडले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

**पंडित जवाहरलाल नेहरू**

मला असे वाटते की, हिंदू समाजातील सर्व जुलमी प्रवृत्तींविरुद्ध बंड करणारे म्हणून प्रामुख्याने आंबेडकरांचे स्मरण राहील. त्यांची जिद्द, चिकाटी आणि सामर्थ्य अलौकिक होते.

**ब्रह्मदेशाचे पंतप्रधान**

आंबेडकर हे एक अत्यंत प्रामाणिक गृहस्थ होते. ते कुशाग्र बुद्धीचे, न्यायशास्त्रज्ञ, स्वाभिमानी आणि दृढनिश्चयी होते. ते प्रगाढ विद्वान असून सरळ मनाने त्यांना भेटणाऱ्यांशी ते जिव्हाळ्याने वागत.

**सी. राजगोपालाचारी**

माझ्या या स्वतंत्र प्रज्ञेच्या आणि अभ्यासू असलेल्या विद्यार्थ्याकडून मलासुद्धा काही शिकण्यासारखे आहे.

**प्राध्यापक कॅनन (इंग्लंड)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हरिजनांचे खरेखुरे बाबा आहेत.

**प्राध्यापक माटे**

न्यायमूर्ती रानडे हे शतकात एखादाच महापुरुष म्हणून जन्माला येणारे शोभतात, तर डॉ. आंबेडकर हे दोनचार शतकांत अवतार घेणारा महापुरुष वाटतो.

**धनंजय कीर**

□

# आंबेडकरांची अमृतवाणी

– आपल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी रक्ताचा शेवटचा थेंब सांडा–वयास आपण तयार असले पाहिजे.

– योग्य साधने नसतील तर ध्येय गाठता येत नाही.

– माणसाकरिता धर्म आहे; धर्माकरिता माणूस नाही

– चारित्र्यहीन व्यक्ती कितीही शिकलेली असली तरी ती पशूहून भयंकर होय.

– माणसाने खावे जगण्यासाठी पण जगावे समाजासाठी.

– सांप्रदायी लोकांना संतांच्या दंतकथा आवडतात. समतेची, भूत–दयेची शिकवण ते हमखास विसरतात.

– हक्क मागून मिळत नाहीत, ते झगडून घ्यावे लागतात. झगडण्या-साठी सामर्थ्य हवे. कारण बकऱ्याला बळी देतात, सिंहाला नाही.

– जग कितीही सुधारले, तरी समता नांदण्यासाठी माणसांची मने उदात्त होणे आवश्यक आहे.

– जन्माने कोणी श्रेष्ठ नाही की कनिष्ठ नाही, मनुष्य आपल्या कर्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो.

– माझे मित्र मला ब्राह्मणांविरुद्ध लढण्याचे आव्हान करतात पण माझा लढा ब्राह्मणांविरुद्ध नाही ब्राह्मण्याच्या कल्पनेविरुद्ध आहे.

– गांधीजींच्या प्राणापेक्षा मला माझ्या साडेसहा कोटी अस्पृश्यांच्या हक्कांचे महत्त्व अधिक वाटते.

– मंदिर बांधतात ते त्यात देवाची स्थापना करण्यासाठी. तिथं जर भुते शिरून नंगानाच घालू लागली तर ते मंदिर पाडावे लागते.

– ग्रंथ माझे मित्र आहेत, माझे साथी आहेत. त्यांचा त्याग करण्याची कल्पनाच मला सहन होत नाही.

– माझ्या अस्पृश्य बांधवांनो, तुम्ही सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशित रहा. पृथ्वीप्रमाणे परप्रकाशित राहू नका.

– राजकीय समता कुचकामाची ठरेल, जर तिला आर्थिक, सामाजिक समतेची बैठक नसेल तर.

– माता भगिनींनो, आपले कपडे फाटके असले तरी ते धुवून स्वच्छ ठेवा. तुम्ही स्वत: शिका आणि मुलांना शिक्षण द्या.

– मानवी जीवनाला भाकरीइतकीच श्रद्धा ही आवश्यक गोष्ट आहे. जुन्या श्रद्धा भंगल्या आहेत. मी नव्या श्रद्धा आणू इच्छितो.

– मानवा-मानवातील फरक नष्ट करणारा बुद्ध हा खरा महात्मा होता.

– घटना कितीही चांगली अगर वाईट असो, तिचे ती राबविणाऱ्या [illegible] महत्त्व अवलंबन आहे.

– देशद्रोहाचा आपल्या देशाला जणू शाप जडलेला दिसतो.

– जयचंदाने महंमद घोरीला बोलाविले शिवाजी महाराजांच्या विरुद्ध काही मराठे व रजपूत मोगलांच्या बाजूने लढले १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात शिखांनी ब्रिटिशांना मदत केली.

– व्यक्तिमाहात्म्य हा लोकशाहीला फार मोठा धोका आहे. राजकारणात भक्ती आणि व्यक्तिपूजा हा अध:पाताचा व हुकूमशाहीचा मार्ग आहे

□

## उजळणीचे प्रश्न

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म केव्हा आणि कोणत्या परि-स्थितीत झाला ?

२) त्यांचे नाव भीमराव का ठेवण्यात आले ?

३) त्यांच्या शिक्षणासंबंधी त्यांच्या वडिलानी कोणती उमेद बाळगली होती ?

४) त्यांचे वडील उत्तम शिक्षक होते हे कशावरून दिसून येते ?

५) पत्नीनिधनाचे दुःख रामजीबाबाना तीव्रतेने का जाणवले ?

६) बाबासाहेबांच्या शिक्षणाची जबाबदारी त्या वेळी कोणी उचलली ? ती कशी ?

७) रामजीबाबांचे शिकवणे पाहून मीराआत्याला काय वाटे ?

८) शाळेत अस्पृश्यतेचे चटके बाबासाहेबाना कसे बसले ?

९) त्याना सहानुभूतीचा हात कोणी दिला ? तो कसा ?

१०) गाडीवान बाबासाहेबाना गाडीतून न्यायला का तयार झाला ?

११) पुढील शिक्षणासाठी बाबासाहेब कोठे गेले ? तेथे त्यांच्या अभ्यासात कशा कशा अडचणी आल्या ?

१२) बाबासाहेबांच्या वडिलानी दुसरे लग्न करण्याचे ठरविताच बाबासाहे-बांच्या मनावर त्याचा काय परिणाम झाला ?

१३) दादासाहेब केळूसकरानी बाबासाहेबाना त्यांच्या शिक्षणाच्या कामात कशी कशी मदत केली ?

१४) मॅट्रिकच्या परीक्षेत अपूर्व यश मिळाल्यावर केळूसकरानी बाबासाहेबाना कोणते पुस्तक दिले ? ते त्याना का आवडले ?

१५) बाबासाहेबांचे लग्न कोणाशी झाले ? त्यांच्या पत्नीचा स्वभाव
होता ?

१६) कॉलेजच्या शिक्षणात बाबासाहेबाना अस्पृश्यतेचे चटके फारसे का ब
नाहीत ?

१७) शिकताना आलेले आर्थिक संकट केळूसकर गुरुजींनी कसे दूर केले

१८) बडोद्याची नोकरी सोडून बाबासाहेब मुंबईस का परतले ?

१९) अमेरिकेला जाण्यात बाबासाहेबाना कोणी व कशी मदत केली ?

२०) अमेरिकेत बाबासाहेबानी अभ्यास कसा केला ? एकूण अमे
जीवन त्याना कसे वाटले ?

२१) परत येऊन एक अधिकारी म्हणून बडोद्याला नोकरी करताना ब
साहेबाना कोणते कटू अनुभव आले ?

२२) बाबासाहेब पुन्हा इंग्लंडला का गेले ? तेथील त्यांच्या जीवनपद्ध
वर्णन करा.

२३) भारतात आल्यावर बाबासाहेबानी काय काय केले ?

२४) आपल्या हरिजन बांधवांची सेवा बाबासाहेबानी कशी केली ?

२५) हिंदुधर्माचा बाबासाहेबाना का वीट आला ?

२६) त्यानी गांधीजींचे प्राण का वाचवले ?

२७) पत्नीनिधनाचे दुःख बाबासाहेबाना का झाले ?

२८) बाबासाहेबाना धर्मांतर का करावेसे वाटले ?

२९) त्याना भारतीय घटनेचे शिल्पकार असे का म्हणतात ?

३०) त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याचे मूल्यमापन विविध नेत्यांन
केले आहे ?

३१) बाबासाहेबांच्या अमृतवाणीतील तुम्हांला आवडणारी एकदोन
उद्धृत करा.

कसा

सले

?

रकन

बा–

तीचे

ा कसे

वचने

॥

]

77

# कुमार वाङ्मय

**रविंद्र गुर्जर**
चार्ली चॅप्लिन
ब्रुस ली

**अ. ज. परब**
क्रांतीवीर भगतसिंग

**चंद्रकांत पाटगावकर**
प्रकाशयात्री जयप्रकाश

**रा. वा. शेवडेगुरुजी**
नेताजी सुभाषचंद्र बोस
अब्राहाम लिंकन
राजा राममोहन रॉय
करुणासागर ईश्वरचंद्र
मदर टेरेसा
विश्वकवी रविबाबू
जाणता राजा श्रीशिवछत्रपती
छत्रपती श्री शिवाजी महाराज
जाणती राणी महाराणी ताराराणी
बुद्धभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**अजब पुस्तकालय**
कोल्हापूर ४१६००२

**माधव मोर्डेकर**
अजित वाडेकर : क्रिकेटच्या मैदानावर मी

**पंढरीनाथ सावंत**
अली दि ग्रेटेस्ट

**शं. रा. देवळे, पाटील**
महावीर वर्धमान

**तु. बा. नाईक**
छत्रपती राजर्षी शाहू महाराज

**प्रभावती देसाई**
भुयारातला खजिना

**आशा कुलकर्णी**
आमची आई खरी ग्रेट हं

**मुमताज रहिमतपुरे**
रमीजा

**पुष्पा चिणे**
दोस्त असावा असा

**नयनतारा देसाई**
अंतिम मुजरा

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
पुणे ४११०३०

कव्हर छपाई : अंजीश, कोल्हापूर